महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
Website : www.mahadiscom.in

क्र. मासंवि/रवका /न.क्र. ३४८/३०५७६
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : agmhrom@gmail.com

**दिनांक : ०५.११.२०१९**

# परिपत्रक

**विषय: ध्वजदिन निधी संकलन - २०१९**

.....

आपल्या देशाच्या सशस्त्र दलातील सैनिक हा आपल्या सर्वांचा प्रेमाचा, आदराचा आणि अभिमानाचा विषय होय. देशाच्या बहुमोल स्वातंत्र्याचे आणि सार्वभौमत्वाचे तो प्राणपणाने रक्षण करतो. आपत्तीच्या काळात आपद्ग्रस्त देशबांधवांच्या मदतीलाही धावून जातो. उन्हातान्हाची, थंडीपावसाची वा कोणत्याही अडचणीची पर्वा न करता हा बहाद्दुर जवान आपली कर्तव्ये बजावत असतो. परकीय शक्तीपासून देशवासीयांचे रक्षण करण्यासाठी आपल्या पाठीशी भक्कमपणे अहोरात्र उभ्या राहणाऱ्या या सैनिकांचे आपल्यावर फार मोठे ऋण असते ते अंशत: जरी फेडायला मिळाले तरी आपल्या सर्वांच्या दृष्टीने ती मोठी संधी ठरते. दरवर्षी याच भावनेतून ७ डिसेंबर, हा दिवस सशस्त्र दलांचा ध्वजादिन म्हणून साजरा होतो.

२. महावितरणने गेल्या तीन वर्षात या निधीला मोठा हातभार लावला आहे. ही कर्तव्य भावना यावर्षीही उत्स्फुर्तपणे प्रकट होण्याच्या दुष्टीने जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मुंबई शहर यांचे पत्र क्र. १३०४/मुशसैकंका-३ दि.०१.०२.२०१९ व १३०४/मुशसैकंका-३ दि.०३.०५.२०१९ अन्वये केलेल्या विनंतीनुसार सक्षम अधिकारी यांनी सन २०१९ करीता ध्वजदिन निधी चे खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे वेतनगट निहाय संकलन करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

| वेतनगट | प्रत्येकी संकलित करण्यात येणारी रक्कम |
|---|---|
| १ | रु. ४००/- |
| २ | रु. ३००/- |
| ३ | रु. २००/- |
| ४ | रु. १००/- |

३. वरित तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेले संकलन हे सांघिक कार्यालयांतर्गत कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे माहे **नोव्हेबर - २०१९** च्या मासीक वेतनातुन करण्यात येईल. ज्या अधिकारी / कर्मचारी यांची मासीक वेतनातुन ध्वजदिन निधीची रक्कम संकलन करण्यास हरकत असेल त्यांनी त्या आशयाचे सर्वांचे कक्ष निहाय एकत्रित पत्र दि. २०.११.२०१९ पुर्वी वेतन व देयके विभागाकडे सादर करावे. अशा अधिकारी / कर्मचारी यांचे वेतनातुन सदरची रक्कम संकलित करण्यात येणार नाही.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या Employee Portal/ e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(राजेंद्र ब. पांडे)
**महाव्यवस्थापक (मासं-मासंव्यप्र)**

D:\Old Data\O&M 01.07.2017\F-348 Govt.Ref\Letter\Flag Day 2019.doc